निशोमो

जिल्हाधिकारी कार्यालय रत्नागिरी
शाखा :- RB
आवक नं.:- 27516
21 JUN 2013
दिरोष नोंद वही नं.:-
पत्र वितरण नं.:-
प्र. जि. नि. उ. जि. जिल्हाधिकारी

# महाराष्ट्र शासन

क्रमांकः- संकीर्ण २०१३/प्र.क्र.८६/ नवि-२०
नगर विकास विभाग,
मुन्त्रा, तळमजला, सीआर २ इमारत,
बॅ. रजनी पटेल मार्ग, नरीमन पॉईंट,
मुंबई ४०० ०२१
दि. १५.०४.२०१३

प्रति,

१. अप्पर मुख्य सचिव, महसूल विभाग,मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.
२. अप्पर मुख्य सचिव, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२
३. प्रधान सचिव, उद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.
४. प्रधान सचिव, गृहनिर्माण विभाग, मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.
५. प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.
६. विभागीय आयुक्त,
कोकण, पुणे, नाशिक, नागपूर, औरंगाबाद, अमरावती महसुली विभाग,
७. सर्व जिल्हाधिकारी,
८. सर्व पोलिस आयुक्त, / पोलिस अधिक्षक,
९. सर्व महानगरपालिका आयुक्त,
१०. आयुक्त तथा संचालक, नगरपरिषद प्रशासन संचालनालय, वरळी, मुंबई,
११. नोंदणी महानिरीक्षक, नवीन प्रशासकीय इमारत, कौ न्सि ल हॉल समोर, पुणे-४११ ००१
१२. महाराष्ट्र औद्योगिक विकास मंडळ, अंधेरी (पूर्व), मुंबई.
१३. मुंबई पोर्ट ट्रस्ट, नॉर्थ एन्ड, ७ एम. एल. डहाणूकर मार्ग, मुंबई-४०० ०२६
१४. मुंबई महानगर प्रादेशिक विकास प्राधिकरण (MMRDA), बांद्रा, मुंबई.
१५. व्यवस्थापकीय संचालक, सिडको, निर्मल भवन, मुंबई-४०० ०२०.
१६. सर्व सह सचिव/ उप सचिव, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई,
१७. सर्व मुख्याधिकारी, नगरपरिषदा/ नगरपंचायती

**विषय** :- अनधिकृत बांधकामाविरूध्द करावयाच्या कारवाईबाबत.

महोदय,

मा. मुख्य सचिव यांनी दिनांक ०४.०४.२०१३ रोजी ठाणे महानगरपालिका हद्दीतील मुंब्रा शिळफाटा येथील बहुमजली इमारत कोसळून झालेल्या दुर्घटनेच्या पार्श्वभूमीवर राज्यातील सर्व विभागीय आयुक्त, जिल्हाधिकारी, पोलिस आयुक्त, / पोलिस अधिक्षक, आयुक्त, महानगरपालिका तसेच, नगरपरिषद/ नगरपंचायतींचे मुख्याधिकारी, यांना दिनांक ०६.०४.२०१३ रोजी व्हिडीओ कॉन्फरन्सिगव्दारे अनधिकृत बांधकामाविरूध्द कारवाई करण्याचे निदेश दिलेले आहेत. त्यासंदर्भातील इतिवृत्त आवश्यक त्या तात्काळ कार्यवाहीकरिता सोबत अग्रेषित करण्यात येत आहे. सदर इतिवृत्तातील निदेशानुसार कार्यवाही करून पूर्तता अहवाल शासनास सादर करावा.

आपला,

**(प्र. शं. शेटे)**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

प्रत माहितीसाठी सादर-

१. मा. मुख्य सचिव,यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुबंई-४०० ०३२.
२. प्रधान सचिव, नगर विकास विभाग / नवि-१, मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.
३. प्रधान सचिव, नगर विकास विभाग / नवि-२, मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.
४. प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.
५. निवडनस्ती नवि-२०

मा.मुख्य सचिव यांनी व्हिडीओ कॉन्फरन्सिंगद्वारे राज्यातील सर्व म.न.पा.आयुक्त, नगर परिषदेचे मुख्य अधिकारी, विभागीय आयुक्त व जिल्हाधिकारी तसेच पोलीस आयुक्त/ पोलीस अधीक्षक यांचेबरोबर दि.०६.०४.२०१३ रोजी सायंकाळी ६.३० ते रात्री १०.०० वाजेपर्यंत अनधिकृत बांधकामाविरुद्ध करावयाच्या कारवाईसंदर्भात घेतलेल्या सभेचे इतिवृत्त.

******

दि.०६.०४.२०१३ रोजी सायंकाळी ६.३० ते रात्री १०.०० वाजेपर्यंत मा.मुख्य सचिव यांनी व्हिडीओ कॉन्फरन्सिंगद्वारे राज्यातील सर्व म.न.पा.आयुक्त, नगर परिषदेचे मुख्य अधिकारी, विभागीय आयुक्त व जिल्हाधिकारी तसेच पोलीस आयुक्त/ पोलीस अधीक्षक यांचेबरोबर वरील विषयाबाबत सभा घेतली. सभेच्यावेळी मा. मुख्य सचिवांसमवेत श्री. यु.पी.एस.मदान, अध्यक्ष, एमएमआरडीए, श्री. श्रीकांत सिंह, प्रधान सचिव, नवि-२, श्री. मनुकुमार श्रीवास्तव, प्रधान सचिव, नवि-१, श्री. देवाशिष चक्रवर्ती, प्रधान सचिव, गृहनिर्माण, श्री. सीताराम कुंटे, म.न.पा.आयुक्त, बृहन्मुंबई महानगर पालिका, श्री. दाते, सह आयुक्त पोलीस व श्री. जावेद अहमद, सह आयुक्त पोलीस हेसुद्धा उपस्थित होते.

सभेत मा. मुख्य सचिव यांनी मुंब्रा येथे झालेल्या दुर्दैवी घटनेचा संदर्भ देऊन सर्व मनपा आयुक्त, नगरपरिषदांचे मुख्याधिकारी व जिल्हाधिकारी यांच्याद्वारे सर्व अनधिकृत बांधकामे शोधून ती पाडण्याचे कडक आदेश दिले. ही कारवाई करताना सर्वप्रथम ज्या बहुमजली धोकादायक इमारती आहेत त्यांना प्राधान्याने तोडण्याचे निर्देश दिले. तसेच असे अनधिकृत बांधकाम करणा-या बांधकाम व्यावसायिक / विकासक यांच्यावर संबंधित मनपा कायदा आणि एमआरटीपी कायद्याच्या तरतूदीअंतर्गत गुन्हा दाखल करण्याचे निर्देश दिले, या कामात कोणत्याही प्रकारची हयगय किंवा निष्काळजीपणा खपवून घेतला जाणार नाही. तसेच ही कारवाई करताना पोलीस आयुक्त व जिल्हा पोलीस अधीक्षक यांनी ताबडतोब आवश्यक ते मनुष्यबळ संबंधित मनपाच्या अधिका-यांना उपलब्ध करुन देण्याचे निर्देश दिले.

शिवाय खालील महत्वाच्या सूचना क्षेत्रिय अधिका-यांना देण्यात आल्याः-

१. सर्व महानगरपालिका आयुक्त यांनी मनपा कायद्यात मार्च २०१२ मध्ये सुधारणा केल्याप्रमाणे महानगरपालिका / नगरपालिकांच्या प्रत्येक विशिष्ट क्षेत्रासाठी पदनिर्देशित अधिकारी नेमण्याची कार्यवाही पूर्ण होऊन राजपत्रात प्रसिद्ध झाली नसेल तर ती ताबडतोब पूर्ण करुन अहवाल सादर करावा. शिवाय शासनाने मार्च २००९ च्या निर्णयाप्रमाणे नागरी क्षेत्राच्या विशेष भागाकरिता अनधिकृत बांधकाम शोधण्यासाठी बीट ऑफिसर नेमण्याची आणि त्यांनी असे अनधिकृत बांधकाम शोधून पदनिर्देशित अधिका-यांना अहवाल देण्याचे सक्त निर्देश देण्यात आले. तसेच या सर्व पदनिर्देशित अधिका-यांनी केलेल्या कामाचा आढावा नियमितपणे

महानगरपालिका आयुक्तांनी घ्यावा. याप्रमाणे महानगरपालिका क्षेत्रात सर्व अनधिकृत, धोकादायक, बहुमजली इमारतींची यादी करून, त्यांना रिकामे करून त्वरित नियमाप्रमाणे ध्वस्त करण्याची कार्यवाही करावी.

२. नागरी क्षेत्रासाठी अतिरिक्त पोलीसबळ निर्मित करण्यासाठी सर्व महानगरपालिका आयुक्त / मुख्य अधिकारी यांनी महानगरपालिकेचा ठराव घेऊन तो त्वरित प्रधान सचिव, नविवि-२ यांच्याकडे सादर करावा.

३. महानगरपालिकेची विशेष सभा घेऊन त्यात मुंब्रा येथील दुर्दैवी घटनेच्या पार्श्वभूमीवर संबंधित महानगरपालिकेमध्ये अनधिकृत धोकादायक बांधकाम हटविण्यासाठी करावयाच्या कारवाईबाबत महानगरपालिका सदस्यांना अवगत करावे.

४. जिल्हाधिका-यांनी त्वरित पालकमंत्री यांना विनंती करुन या विषयाबाबत जिल्हा नियोजन समितीची विशेष सभा आयोजित करावी.

५. अनधिकृत बांधकाम करणा-या बांधकाम व्यावसायिकांचे / विकासकांचे नाव वर्तमानपत्रात तसेच वेबसाईटवर प्रसिद्ध करण्यात यावे.

६. जे नोटरी सदनिका खरेदी / विक्रीचे व्यवहार प्रमाणित करतात त्यांच्यावर संबंधित जिल्हाधिकारी / आयजीआर यांनी कारवाई करावी.

७. ज्या अनधिकृत धोकादायक इमारती ताबडतोब पाडणे शक्य नसेल त्या इमारती कमीत कमी रिकाम्या तरी करुन घ्याव्यात.

८. महानगरपालिका कायद्यात मार्च १२ मध्ये करण्यात आलेल्या सुधारणांप्रमाणे पदनिर्देशित अधिका-यांनी अनधिकृत बांधकामाबाबत केलेली कार्यवाही Non Justiciable करण्यात आली आहे. करिता जर या प्रकरणात काही दिवाणी न्यायालयांनी यामध्ये स्थगन / स्टेटसको आदेश दिले असतील तर हयाबाबत महानगरपालिकाने दिवाणी न्यायालयांच्या निदर्शनास आणून देऊन स्थगन / स्टेटसको आदेश रद्द करुन घ्यावे. त्यांनी जर हे आदेश रद्द केले नाही तर त्याबाबत उच्च न्यायालयात अपील करुन ते रद्द करुन घ्यावेत.

९. शासकीय जागा / शासकीय मंडळ / महामंडळ जसे एमआयडीसी /बीपीटी / जिल्हाधिकारी यांच्या जमिनीवर होत असलेल्या अनधिकृत बांधकामाबाबत संबंधित जिल्हाधिकारी व संबंधित मंडळ / महामंडळ यांच्या अधिका-यांनी लक्ष देणे आवश्यक आहे. आणि त्यांनी जर या कामात कामचुकारपणा केला तर मनपाला एमआरटीपी कायद्याअंतर्गत सदरहू अनधिकृत बांधकामावरील कारवाई करताना

संबंधित शासकीय संस्थेच्या मालमत्ता विभागाच्या अधिका-यांवरसुद्धा कारवाई करणे भाग पडेल.

१०. नागरी क्षेत्राचे सलग ग्रामीण क्षेत्रासाठी जर काही नियोजन प्राधिकरण घोषित नसेल तर या क्षेत्रावरील अनधिकृत धोकादायक बांधकाम तोडण्याबाबतची कार्यवाही जिल्हाधिकारी यांनी करावी.

११. पोलीस आयुक्त / जिल्हा पोलीस अधीक्षक यांनी अनधिकृत धोकादायक इमारती पाडण्यासाठी संबंधित महानगरपालिका अधिका-यांना ताबडतोब पोलीसबळ उपलब्ध करुन दयावे. तसेच हे बांधकाम तोडताना संबंधित अधिका-यांवर धमकी इत्यादीसारखे प्रकार घडत असतील तर पोलीसांनी संबंधितांवर ताबडतोब गुन्हे दाखल करावे.

१२. जिल्हाधिकारी आणि महानगरपालिका आयुक्त यांनी त्वरित सर्व राज्य आणि केंद्र शासनाच्या अधिका-यांची बैठक घेवून त्यांचे अधिनस्थ जमिनीचे संरक्षण करण्याबाबत त्यांना अतिक्रमण हटविण्याबाबत सूचना दयावी व त्याचे कार्यपालन करण्यासाठी कार्यवाही करावी.

१३. अपर मुख्य सचिव (नियोजन) यांनी DPC मार्फत राज्य शासनाच्या जमिनींच्या संरक्षणाकरिता योग्य योजना करून सर्व जिल्हाधिकारी यांना यासाठी योग्य खर्च करण्यासाठी सूचना दयावी. हा निधी सर्व राज्य कार्यालयांसाठी उपलब्ध होईल. प्रधान सचिव नगर विकास यांनी याबाबत दर तिमाही आढावा घ्यावा व शासनास अहवाल सादर करावा.

*****